## जिल्हा नियोजन समिती
## जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
## परिपत्रक क्र. : जिनिस/व्हिजन२०२०/१६१/२०१०
## दिनांक १ मे, २०१०

**प्रस्तावना :-** संताची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम कमांकावर असलेल्या या जिल्हयाचें क्षेत्रफळ १७,४१२ चौ.कि.मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६६ टक्के इतके आहे.

अहमदनगर जिल्हयास एकूण सात जिल्हयांच्या सीमा लागून आहेत. उत्तर सीमेवर नाशिक, ईशान्येस औरंगाबाद, पूर्वेस बीड व उस्मानाबाद, दक्षिण सीमेवर सोलापूर आणि पश्चिम सीमेवर ठाणे व पुणे जिल्हा वसलेले आहेत. हा जिल्हा राज्याच्या मध्यवर्ती असल्याने दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध असून इतर जिल्हयातून येण्यासाठी बस सेवा व रेल्वे सुविधा आहे. नुकतेच शिर्डी येथे विमानतळ प्रस्तावित करण्यात आले असून ते आगामी वर्षात कार्यान्वित होईल अशी अपेक्षा आहे.

अहमदनगर शहर हे मध्यमयुगीन महाराष्ट्राचा इतिहास घडविणारे निजामशाहीच्या राजधानीचे ठिकाण होते. निजामशाहीतील अनेक महत्वाच्या वास्तू ५०० वर्षानंतरही आज येथे अस्तित्वात आहेत. अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ला, चांदबिबी महाल (सलाबत खानची कबर), फराहबक्ष महाल, औरंगजेबाचे मृत्यूस्थळ (आलमगीर), दमडी मशिद, बागरोजा, हस्त-बेहस्त महाल आदी ऐतिहासिक स्थळे आहेत. जिल्हयात लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले शिर्डी, शनिशिंगणापूर, गोरक्षनाथ गड, सिध्दटेक, मोहटादेवी, भगवानगड, वृध्देश्वर, मढी, अगस्तीऋषींचा आश्रम अशी अनेक तीर्थक्षेत्र आहेत. निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने भंडारदरा, रंधा-धबधबा, मुळा धरण, निघोज कुंड, रेहकुरी अभयारण्य अशी जिल्हयातील अनेक स्थळे महत्वाची आहेत.

स्वातंत्र संग्रामातील अग्रणी पंडित जवाहरलाल नेहरु, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत अशा १२ ज्येष्ठ राष्ट्रीय नेत्यांना १९४२ मध्ये चले जाव लढयाच्या चळवळीत ३ वर्षे अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ल्यात स्थानबध्द करण्यात आले होते. येथील वास्तव्यात पंडितजींनी **डिस्कव्हरी ऑफ इंडिया** या जगप्रसिध्द ग्रंथाचे लिखाण केले. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांनी **ज्ञानेश्वरी** चे कथन जिल्हयातील नेवासा येथे केले.

एकेकाळी वैभवपूर्ण व संपन्न असलेला अहमदनगर जिल्हा आज लगतच्या इतर जिल्हयाच्या तुलनेत अविकसीत असल्याचे दिसुन येते. अहमदनगर जिल्ह्याच्या लगतच्या पुणे, औरंगाबाद, नाशिक, ठाणे या जिल्हयाच्या विकासाची गती अहमदनगर जिल्हा गाठू शकला नाही. ज्या क्षेत्रात विकासाची गती कमी दिसुन येते त्याची कारणे शोधून विकासास चालना देण्याचे प्रमुख काम व्हिजन-२०२० च्या माध्यमातून करण्यात येईल. याकरीता सर्व विकास क्षेत्राचा समतोल विकास साधण्यासाठी आगामी १० वर्षात अहमदनगर जिल्ह्यात नियोजनबध्द प्रगत जिल्हा म्हणून आणि राज्याला मार्गदर्शक ठरावा अशी विकास कामे करणे आवश्यक आहे. या दृष्टीने आगामी १० वर्षाचा बृहत विकास आराखडा तयार करण्याचे प्रस्तावीत आहे.

सध्यस्थितीत जिल्हयाचा विकास आराखडा हा कार्यान्वयीन यंत्रणांनी सादर केलेल्या मागणीनुसार तयार करण्यात येतो आणि त्यानंतर त्याची अंमलबजावणी ग्रामस्तरावर होत असते. मात्र पंचायत राज व्यवस्थेत ग्रामस्तरावरुन आराखडा तयार करुन तद्नंतरच जिल्हास्तरावर या विकास योजना तयार होणे अपेक्षित आहे. (Botom up Planning). योजनांचा आराखडा तयार करण्याचे काम राज्य ते ग्रामस्तरावर अथवा जिल्हास्तर ते ग्रामस्तर असे न होता ते ग्रामस्तर ते जिल्हास्तर आणि जिल्हास्तर ते राज्यस्तरावर असे होणे अपेक्षित आहे. तसेच केवळ एका वर्षाचा आराखडा तयार न करता आगामी १० वर्षाचा निश्चित आराखडा तयार करुन त्यांची अंमलबजावणी त्या त्या विकासनिधी नुसार केल्यास विकासदर निश्चित वाढू शकतो आणि विकासाला निश्चित अशी दिशा मिळेल. यादृष्टीने **अहमदनगर जिल्हा व्हिजन २०२०** चा बृहत आराखडा तयार करण्यात येत आहे. हा आराखडा तयार करतांना नियोजन आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ग्रामस्तरावरुन माहितीचे संकलन करुन त्यांच्या गरजेनुसार योजना मंजूर झाल्यास त्याची अंमलबजावणी देखील उत्कृष्ट होवू शकेल असे वाटते. त्यादृष्टीने ग्रामस्तरावर आराखडा तयार करुन त्याची छाननी तालुकास्तरावर करण्यात येईल आणि तालुक्याचा आराखडा तयार होईल. सर्व तालुक्यांची माहिती एकत्र केल्यावर जिल्ह्याचा आराखडा तयार करण्यासाठी विषयवार समित्यांकडे सादर करतील.

जिल्हास्तरावरील विषयवार समित्यांमार्फत या आराखड्याची छाननी करण्यात येईल त्यांनी जिल्हास्तरावर संकलित केलेली माहीती आणि ग्रामस्तरावरुन प्राप्त झालेला आराखडा मिळून संयुक्त आराखडा तयार करण्यात येईल. विषयवार समित्या हा विकास आराखडा अहमदनगर व्हिजन-२०२० मध्ये समावेश करतील आणि त्याची अंमलबजावणी आगामी १० वर्षात करणे करीता ठोस पावले उचलतील. हा विकास आराखडा आगामी २ महिन्यात पूर्ण करण्याचे दृष्टीने मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हयाचा विकास आराखडा तयार करण्याकरीता विविधस्तरावर समित्या गठीत करण्यात येत असुन त्या खालीलप्रमाणे आहेत.

**अ) अहमदनगर विकास मंच ( Ahmednagar Development Forum )**

मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली जिल्हयातील सर्व सन्माननीय मंत्री, सर्व संसद आणि विधानमंडळ सदस्य, शिर्डी/ शनिशिंगणापुर/ मढी आणि मोहटादेवी या देवस्थानाचे अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष तसेच जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, महानगरपालिका महापौर, उपमहापौर, नगरपरिषद अध्यक्ष आदिंचा यात समावेश करण्यात आला असुन या समितीचे सदस्य सचिव म्हणुन मा.जिल्हाधिकारी हे काम पाहतील तर नियुक्त केलेल्या स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी हे जिल्हा समन्वयक म्हणून काम पाहतील. अहमदनगर विकास मंच मधिल सदस्यांची सविस्तर यादी **परिशिष्ट-अ** मध्ये जोडली आहे.

**ब) जिल्हास्तरावरील विषयवार समित्या :**

जिल्हास्तरावर एकुण १५ **विषयवार समित्या** नियुक्त करण्यात येत आहे. या समित्यांच्या सदस्यांत अहमदनगर विकास मंच मधील सदस्य आणि विशिष्ट विषयाची संबंधित असलेले इतर अधिकारी, मान्यवर यांचा समावेश करण्यात आला आहे. या समित्यात प्रामुख्याने कृषी व संलग्न सेवा क्षेत्र विकास समिती, सिंचन क्षेत्र विकास समिती, आरोग्य क्षेत्र विकास समिती, पर्यटन व तिर्थक्षेत्र विकास समिती, औद्योगिक क्षेत्र विकास

समिती, नागरी आणि ग्रामीण क्षेत्र विकास समिती, पतपुरवठा योजना विकास समिती, इत्यादी समित्यांचा समावेश आहे. या समिती करीता अध्यक्ष, उपाध्यक्ष अशी पदे असणार नाहीत. सदर विषयाशी संबंधित जिल्हास्तरावरील अधिकारी समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहतील. विषयवार बैठकांचे आयोजन करुन बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी, पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाने आराखडा तयार करण्यात येईल. राज्यातील विषय तज्ञांसमवेत चर्चासत्र आयोजीत करतील आणि जिल्ह्याचा सर्वंकष १० वर्षात आराखडा तयार करतांना तज्ञांचे मार्गदर्शन आणि ग्रामस्तरावरुन प्राप्त होणारा आराखडा यांचा समावेश करुन आराखडयास अंतिम स्वरुप देतील. या समित्यांचा तपशिल **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविला आहे. तर विषयवार समित्यांची रचना आणि सदस्यांचा तपशिल **परिशिष्ट-क** मध्ये दर्शविला आहे.

**क) तालुकास्तरीय समित्या :**

प्रत्येक तालुक्यासाठी संबधीत उपविभागीय अधिकारी यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करुन त्या तालुक्यातील संबंधीत आमदार, पंचायत समिती सभापती, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, तालुक्यातील प्रमुख राजकीय पक्षांचे तालुकाध्यक्ष, तालुक्यातील प्रमुख तिर्थक्षेत्र देवस्थानचे अध्यक्ष, नगरपालिकांचे नगराध्यक्ष, तालुकास्तरावरील सर्व अधिकारी असे या समितीचे स्वरुप असेल. उपविभागीय अधिकारी यांनी तालुका समिती गठीत करुन याबातचे आदेश निर्गमित करुन त्याची प्रत जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

**ड) ग्रामस्तरावरील समिती**

प्रत्येक महसूल गावांकरीता एक **ग्रामविकास समिती** नियुक्ती करण्यात येत आहे. तालुकास्तरावरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांना ८ ते १० गावासाठी समन्वयक म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. या ग्रामस्तरावरील समितीत गावाचे सरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गावचे तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, अंगणवाडी सेविका हे या समितीत सदस्य असतील. तहसिलदार यांनी ग्रामसमिती गठीत करुन याबाबतचे आदेश निर्गमीत करावयाचे आहेत.

ग्रामस्तरावरील समितीमध्ये नियुक्त करावयाच्या तालुका वर्ग १ व २ अधिका-यांच्या नियुक्त्या या संबंधित उपविभागीय अधिकारी करतील. तालुक्यातील वर्ग १ व २ अधिका-यांची संख्या आणि गावांची संख्या विचारात घेऊन सर्वसाधारणपणे प्रत्येक अधिका-यांना ४ ते ६ गांवांची जबाबदारी देण्यात येईल. याबाबतचे आदेश संबंधीत उपविभागीय अधिकारी काढतील व त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

**इ) शहर भागाकरीता समिती :** जिल्ह्यातील विविध शहरी भागांकरीता **शहर विकास समित्यांची** नियुक्ती करण्यात येत आहे. महानगर पालिका क्षेत्राकरीता आणि नगर पालिका/नगर परिषदा/ नगर पंचायत क्षेत्राकरीता यांचेस्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे. महानगर पालिका क्षेत्राकरीता मनपा आयुक्त आणि उर्वरीत नागरी संस्थांकरीता संबंधित मुख्याधिकारी हे समन्वयक म्हणून काम पाहतील. स्थानिक नागरी संस्थानचे सर्व सदस्य हे या समितीचे सदस्य म्हणून काम पाहतील. तसेच शहरी भागातील संबंधीत लोकसभा सदस्य आणि विधान सभा सदस्य आणि त्या क्षेत्रात कायम वास्तव्यास असलेले राज्यसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य हे या समितीचे सदस्य असतील. तसेच समितीत नागरी संस्थान मध्ये सेवेत असलेले इतर अधिकारी यांचा देखील सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे. नागरी क्षेत्राचा आराखडा तयार करुन ते आयुक्त मनपा यांचेकडे सादर करतील आयुक्तांनी जिल्ह्याचा नागरी क्षेत्राचा विकास आराखडा तयार करावयाचा आहे.

# विविध समित्यांची कार्ये

## अ) ग्रामविकास समितीचे कार्ये :

गावाकरीता नियुक्त केलेल्या समन्वय अधिका-यांच्या उपस्थितीत **प्रथम ग्रामसभेचे** आयोजन करुन ग्रामसभेस **व्हिजन २०१०** प्रकल्पा संदर्भात माहिती देतील. आगामी १० वर्षात आपल्या गावाचा विकास होण्याच्या दृष्टीने आणि आगामी १० वर्षात आपले गाव कसे असावे याबाबत चर्चा करतील. या चर्चे दरम्यान गावात उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांची सध्यस्थितीची माहिती विहीत केलेल्या **ग्रामआराखडा** पत्रकात नोंदवतील गावक-यांशी चर्चा करुन आगामी १० वर्षात गावात कोणकोणत्या सोई-सुविधा आवश्यक आहे याबाबत चर्चा करतील.

चर्चा करतांना समन्वयकास गावासंबंधीची आवश्यक माहिती असणे आवश्यक आहे. तसेच आजची लोकसंख्या आणि आगामी १० वर्षात होणारी लोकसंख्येची वाढ, त्या अनुषंगाने लागणा-या सोई-सुविधा याबाबींचा अंदाज असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या तुलनेत प्रमुख मानव विकास निर्देशांकात गावाची स्थिती कशी आहे?, उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी कार्य प्रयत्न करणे आवश्यक आहे?, दारिद्र्य रेषेखालील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढीसाठी करावयाचे प्रयत्न, गावाची भौगोलीक परिस्थीती, लोकांच्या गरजा आणि आगामी १० वर्षात टप्पा-टप्प्याने साधावयाचा विकास याबाबतची थोडक्यात माहिती असणे आवश्यक आहे.

ग्रामआराखडा पत्रकातील माहिती अंतिम केल्यानंतर ह्या माहितीचे वाचन करण्याकरीता **दुसरी ग्रामसभा** घेण्यात यावी. या ग्रामसभेत ग्रामआराखडा पत्रकात तयार केलेला आराखड्यास मान्यता घेण्यात यावी. तसेच काही बाबी समाविष्ट करण्याबाबत निर्णय झाला असल्यास त्याबाबी देखील आराखड्यात समाविष्ट करुन अंतिम आराखडा तालुकास्तरावर सादर करावयाचा आहे.

## ब) तालुकास्तरीय समितीची कार्ये :

ग्रामस्तरावरुन प्राप्त झालेला **ग्रामआराखडा** पत्रकाची छाननी व एकत्रिकरण तालुकास्तरीय समिती मार्फत करण्यात येईल. याकरीता आवश्यक त्या कर्मचा-यांची नियुक्ती संबंधित उपविभागीय अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार तहसिलदार यांनी करावयाच्या आहेत. तालुक्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने गावनिहाय प्राप्त आराखड्या व्यतिरिक्त तालुका समितीने गुणवत्तापुर्वक बाबींचा समावेश करणे आवश्यक राहील. समिती अशा बाबींचा गावनिहाय समावेश करुन तालुक्याचा आराखडा अंतिम करतील. आराखड्याची माहिती नोंदणी तालुकास्तरावरच करण्यात येईल. संगणकावर माहिती नोंदणीकरीता आवश्यक त्या संगणकीय प्रणाली (Software) उपविभागीय अधिकारी यांना पुरविण्यात येईल. संगणकावर नोंदविलेल्या माहितीचा वापर करुन संगणकीय प्रणालीच्या आधारे विषयवार आराखडे तयार होतील. हे विषयवार आराखडे उपविभागीय अधिकारी जिल्हास्तरीय विषयवार समित्यांकडे सुपुर्द करतील.

## क) शहर विकास समितीचे कार्ये :

जिल्ह्यातील प्रत्येक शहरी भागाकरीता नियुक्त केलेल्या समन्वय अधिका-यांच्या उपस्थितीत प्रत्येक वार्ड साठी **प्रथम वार्डसभेचे** आयोजन करुन वार्डसभेस **व्हिजन २०१०** प्रकल्पा संदर्भात माहिती देतील. आगामी १० वर्षात आपल्या वार्डचा विकास होण्याच्या दृष्टीने आणि आगामी १० वर्षात आपला वार्ड कसा

असावा, याबाबत चर्चा करतील. या चर्चे दरम्यान वार्डात उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांची सध्यस्थितीची माहिती विहीत केलेल्या **वार्ड आराखडा** पत्रकात नोंदवतील नागरीकांशी चर्चा करुन आगामी १० वर्षात वार्डात कोणकोणत्या सोई-सुविधा आवश्यक आहे याबाबत चर्चा करतील.

चर्चा करतांना समन्वयकास वार्डसंबंधीची आवश्यक माहिती असणे आवश्यक आहे. तसेच वार्डमधिल आजची लोकसंख्या आणि आगामी १० वर्षात होणारी लोकसंख्येची वाढ, त्या अनुषंगाने लागणा-या सोई-सुविधा याबाबींचा अंदाज असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तेथील भौगोलीक परिस्थीती, नागरीकांच्या गरजा आणि आगामी १० वर्षात टप्पा-टप्प्याने साधावयाचा विकास याबाबतची थोडक्यात माहिती असणे आवश्यक आहे.

वार्ड आराखडा पत्रकातील माहिती अंतिम केल्यानंतर ह्या माहितीचे वाचन करण्याकरीता **दुसरी वार्डसभा** घेण्यात यावी. या वार्डसभेत वार्ड आराखडा पत्रकात तयार केलेला आराखड्यास मान्यता घेण्यात यावी. तसेच काही बाबी समाविष्ट करण्याबाबत निर्णय झाला असल्यास त्याबाबी देखील आराखड्यात समाविष्ट करुन अंतिम आराखडा त्या-त्या स्थानिक संस्थांकडील समन्वयक अधिका-यांकडे जमा करावयाचा आहे.

वार्डस्तरावरुन प्राप्त झालेला **वार्ड आराखडा** पत्रकाची छाननी व एकत्रिकरण त्या-त्या स्थानिक संस्थांकडे समन्वय अधिका-यांनी करावयाची आहे. याकरीता आवश्यक त्या कर्मचा-यांची नियुक्ती संबंधित आयुक्त/ मुख्याधिकारी यांनी करावयाच्या आहेत. समन्वय अधिकारी यांनी आपल्या शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने वार्डनिहाय प्राप्त आराखड्या व्यतिरिक्त काही बाबींचा समावेश करावयाचा असल्यास या बाबींचा समावेश करुन शहराचा आराखडा अंतिम करावयाचा आहे. आराखड्याची माहिती नोंदणी संबंधित नागरी संस्थेकडेच करण्यात येईल. संगणकावर माहिती नोंदणीकरीता आवश्यक त्या संगणकीय प्रणाली (Softwares) मनपा आयुक्तांमार्फत पुरविण्यात येईल. संगणकावर नोंदविलेल्या माहितीचा वापर करुन संगणकीय प्रणालीच्या आधारे विषयवार आराखडे तयार होतील. हे विषयवार आराखडे आयुक्त, महानगर पालिका, अहमदनगर यांना सादर करावयाचा आहे.

आयुक्तांकडे जिल्ह्यातील सर्व शहरीभागाचे विषयवार आराखडे प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन जिल्ह्यातील सर्व शहरी भागांचे एकत्रित विषयवार आराखडे जिल्हास्तरीय विषयवार समित्यांकडे सुपुर्द करण्यात येतील.

**ड) जिल्हास्तरावरील विषयवार समितीची कार्ये :**

जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विषयवार विकास आराखडे तयार होणे अपेक्षीत आहे. या आराखड्याच्या आधारे संबंधित विषयाची जिल्ह्याची विकासाची उदिष्ट्ये समितीनेच निश्चित करुन द्यावयाची आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांकडून त्या-त्या विषयाकरीता गावनिहाय आणि शहरातील वार्ड निहाय विकास प्राप्त होतील. ही सर्व माहिती संगणकीय स्वरुपात प्राप्त होईल. ही माहिती प्राथमिक स्वरुपाची असेल या माहितीचा आधार घेऊन जिल्हास्तरावर चर्चासत्रे आयोजीत करण्यात येतील. प्राप्त माहितीच्या व्यतिरिक्त विषय समिती आवश्यकतेनुसार गुणवत्तापुर्वक बाबींचा समावेश करतील.

त्या दृष्टीने गावनिहाय आणि वार्ड निहाय माहिती उपलब्ध होणार आहे. या माहिती सोबतच विषय तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन/ त्यांचेसमवेत चर्चासत्र आयोजीत करुन, जिल्हास्तरावर विकास आराखडे संबंधित विषयवार समितीने तयार करावयाचे आहेत. यासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन समितीने करावयाचे आहे. विषयवार समित्यांना जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकात अपेक्षीत वाढीचे देखील उद्दीष्टे निश्चित करावे लागतील. ग्रामस्तरावरील आराखडे आणि जिल्हास्तरावर तयार केलेले आराखडे एकत्रित करुन जिल्ह्याचा विकास विषयवार आराखडा तयार करण्यात येईल.

जिल्ह्याचा संबंधित विषय समितीचा आराखडा अंतिम करतांना विकासाकरीता उपयुक्त अशा विशेष योजनेचा अंतर्भाव देखील करणे अपेक्षीत आहे, एकूण प्राप्त प्रस्तावांची वर्षनिहाय तसेच निधीच्या स्त्रोत निहाय मांडणी देखील या समितींने करावयाची आहे. त्यानंतर हे आराखडे अंतिम उदिष्टांसह अहमदनगर विकास मंचाकडे सादर करण्यात येतील.

**इ) अहमदनगर विकास मंच कार्ये व अंमलबजावणी :**

ग्रामीण भागातील ग्रामस्तरावरुन आणि शहरी भागातून वार्डस्तरावरुन आराखडे तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे. हे आराखडे तयार करण्यासाठी जनजागृती करुन लोकांचा सहभाग वाढविणे, जिल्हास्तरावर विषयवार समित्यांचे नियुक्ती करणे, त्यांच्या मार्फत विषय तज्ञांसमवेत चर्चा सत्र आयोजीत करणे. तालुकास्तरावर संगणकीय प्रणाली पुरविणे. विषयवार समित्यांचे चर्चासत्रात निश्चित केल्याप्रमाणे आणि आवश्यकतेनुसार अतिरिक्त माहितीचे संकलन करणे ही प्राथमिक जबाबदारी या समितीवर असणार आहे.

विषयवार समित्यांकरीता योजनानिहाय आणि आगामी १० वर्षात अपेक्षीत तरतुदींची माहिती विकास मंच संकलीत करतील. या माहितीच्या आधारे जिल्ह्यात विविध विकास योजना राबविण्यासाठी आगामी १० वर्षाचा बृहत विकास आराखडा तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देईल.

जिल्हयाचा अंतिम आराखड्यातील योजनांसाठी वर्षनिहाय तरतुदींसाठी जिल्हा वार्षिक योजना, राज्य योजना आणि केंद्र योजना यात समावेश करुन जिल्हयाच्या विकासाकरीता जास्तीत जास्त निधी प्राप्त करुन घेणे आणि त्याकरीता कृती आराखडा तयार करुन शासनास सादर करणे ही महत्वाची जबाबदारी या विकास मंचास पार पाडावयाची आहे.

**जिल्हाधिकारी अहमदनगर**
**तथा सदस्य सचिव, अहमदनगर विकास मंच**

# मानव विकास अहवाल आणि अहमदनगर जिल्हा

## महत्वाचे निर्देशांक

| अ. क्र. | बाब | अहमदनगर निर्देशांक | महाराष्ट्र निर्देशांक | महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्याचा क्रम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **लोकसंख्या (जनगणना 2001 नुसार)** | | | | |
| 1 | एकुण लोकसंख्या (लाखात) | 40.40 | 967.52 | 5 |
| 2 | दशवार्षिक वृध्दी दर (1991-2001) | 19.80 | 22.57 | 21 |
| 3 | लोकसंख्येची घनता (प्रती चौ.कि.मी.) | 232 | 314 | 15 |
| 4 | स्त्री-पुरुष प्रमाण (1000 पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण) | 940 | 922 | 17 |
| 5 | अनुसुचित जातीचे प्रमाण (टक्केवारी) | 12.00 | 10.20 | -- |
| 6 | अनुसुचित जमातीचे प्रमाण (टक्केवारी) | 7.51 | 8.9 | -- |
| **आर्थिक वृध्दी व दारीद्र्य** | | | | |
| 1 | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण (2002) | 23.82 | 34.55 | 6 |
| 2 | निव्वळ जिल्हा उत्पन्न 2008-09 (रु. हजार कोटी ) | 21.16 | 597.54 | 7 |
| 3 | दरडोई उत्पन्न 2008-09 (रुपयात) | 47,856 | 54,867 | 9 |
| 4 | जिल्हा उत्पन्नाचा राज्य उत्पन्नात वाटा 2008-09 | 3.54 | -- | 7 |
| 5 | जिल्हा उत्पन्नातील झालेली वाढ (2007-08 व 2008-09) | 16.36 | 13.49 | 7 |
| 6 | दरडोई उत्पन्न 2007-08 आणि 2008-09 मध्ये झालेली वाढ | 15.08 | 11.84 | 7 |
| 7 | प्राथमिक क्षेत्राचा वाटा (टक्केवारी) | 27 | 13 | -- |
| 8 | द्वितीय क्षेत्राचा वाटा (टक्केवारी) | 18 | 27 | -- |
| 9 | तृतीय क्षेत्राचा वाटा (टक्केवारी) | 55 | 60 | -- |
| **शिक्षण (मानव विकास अहवाल 2002 नुसार)** | | | | |
| 1 | साक्षरतेचे प्रमाण (टक्केवारी) | 75.30 | 77.27 | 18 |
| 2 | शाळेतील सरासरी वर्ष (1 ते 7) | 4.55 | 4.97 | 22 |
| 3 | गळतीचे प्रमाण (1 ते 7) (टक्केवारी) | 41 | 31 | 26 |
| 4 | गळतीचे प्रमाण (1 ते 10) (टक्केवारी) | 60 | 53 | 22 |
| 5 | प्रती शिक्षक विद्यार्थी संख्या (प्राथमिक शाळा) | 41 | 39 | 21 |
| 6 | प्रती शिक्षक विद्यार्थी संख्या (माध्यमिक शाळा) | 33 | 32 | 16 |

| अ. क्र. | बाब | अहमदनगर निर्देशांक | महाराष्ट्र निर्देशांक | महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्याचा क्रम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **आरोग्य (मानव विकास अहवालानुसार)** | | | | |
| 1 | बाल मृत्यू दर (दर हजारी) | 47 | 74 | 5 |
| 2 | 5 वर्षाखालील बालमृत्यू दर (दर हजारी) | 60 | 91 | 4 |
| 3 | 18 वर्षाखालील विवाहीत मुलींचे प्रमाण | 40.80 | 28.80 | 21 |
| 4 | प्रतिलाख लोकसंख्येमागे प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या | 2.70 | 3.10 | -- |
| 5 | प्रतिलाख लोकसंख्येमागे आरोग्य उप केंद्रांची संख्या | 14 | 17 | -- |
| **मानव विकास निर्देशांक** | | | | |
| 1 | मानव विकास निर्देशांक | 0.57 | 0.58 | 11 |

o o o

# परिशिष्ट - अ

## अहमदनगर जिल्हा विकास मंच
## सदस्यांची यादी

| अ.क्र. | सदस्य | पदनाम | मा. सदस्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. पालकमंत्री अहमदनगर जिल्हा | **अध्यक्ष** | मा. ना. श्री. बबनराव भिकाजी पाचपुते,<br>मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र शासन तथा<br>पालकमंत्री अहमदनगर जिल्हा |
| २ | जिल्हयातील सन्माननीय मंत्री | **सहअध्यक्ष** | मा.ना. श्री. बाळासाहेब थोरात<br>मंत्री कृषी जलसंधारण, रोजगार हमी आणि शालेय<br>शिक्षण, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई -३२ |
| ३ | | **सहअध्यक्ष** | मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील<br>मंत्री, परिवहन, बंदरे, विधी व न्याय,<br>महाराष्ट्र शासन, मुंबई-३२ |
| ४ | जिल्हयातील मा. संसद सदस्य | सदस्य | १) मा.खा.श्री. गोविंदराव आदिक<br>श्रीरामपूर ता. श्रीरामपूर |
| ५ | | सदस्य | २) मा.खा.श्री वाकचौरे भाऊसाहेब राजाराम,<br>साई अर्पण, साई श्रध्दा, को-ऑप हो. सोसा.<br>भक्त निवासच्या पाठीमागे शिर्डी ता. राहाता |
| ६ | | सदस्य | ३) मा.खा.श्री. गांधी दिलीपकुमार मनसुखलाल<br>देवेंद्र बंगला,आनंदऋषी मार्ग ,<br>धार्मिक परीक्षा बोर्डाजवळ,अहमदनगर |
| ७ | जिल्हयातील विधीमंडळ सदस्य (विपस ) (विसस) | सदस्य | १) मा.आ.श्री. अरुणकाका जगताप<br>बलवात्सल्य, भवानीनगर,मार्केट यार्ड शेजारी, अ'नगर |
| ८ | | सदस्य | २) मा.आ डॉ. श्री सुधीर तांबे<br>इंदिरा नगर ता. संगमनेर |
| ९ | | सदस्य | ३) मा.आ.श्री पिचड मधुकर काशिनाथ<br>मु.पो. राजूर ता. अकोले, जि. अहमदनगर |
| १० | | सदस्य | ४) मा.आ. श्री अशोकराव शंकरराव काळे<br>राधासदन, मु.पो. माहेगांव देशमुख ता. कोपरगांव |
| ११ | | सदस्य | ५) मा.आ.श्री. कांबळे भाउसाहेब मल्हारी<br>गोंधवणी वा.ग. १ श्रीरामपूर जि. अहमदनगर |
| १२ | | सदस्य | ६) मा.आ. श्री गडाख शंकरराव यशवंतराव<br>मु.पो. सोनई ता. नेवासा. जि. अहमदनगर |
| १३ | | सदस्य | ७) मा.आ.श्री.चंद्रशेखर मारुतराव घुले<br>मु.पो. दहिगांव ने ता. शेवगांव जि. अहमदनगर |
| १४ | | सदस्य | ८)मा.आ. श्री. कर्डीले शिवाजी भानुदास<br>मु.पो. बु-हाणनगर, ता. जि. अहमदनगर |
| १५ | | सदस्य | ९) मा.आ.श्री औटी विजयराव भास्करराव<br>मु.पो. पारनेर ता. पारनेर जि. अहमदनगर |
| १६ | | सदस्य | १०) मा.आ.श्री अनिलभैय्या रामकिसन राठोड<br>घ.न. ८२१,कुंभार गल्ली, बागडपट्टी, तोफखाना, |
| १७ | | सदस्य | ११) मा.आ.श्री.प्रा.राम शंकर शिंदे<br>मु.पो. चोंडी ता. जामखेड. जि. अहमदनगर |

| अ.क्र. | सदस्य | पदनाम | मा. सदस्याचे नाव |
|---|---|---|---|
| १८ | सामाजिक क्षेत्रातील मान्यवर | सदस्य | १) मा. श्री. बाळासाहेब विखे पाटील<br>मु.पो. लोणी ता. राहाता |
| १९ | | सदस्य | २) मा. श्री. अण्णासाहेब हजारे<br>राळेगण सिध्दी ता. पारनेर |
| २० | | सदस्य | ३) मा. श्री पोपटराव पवार<br>हिवरे बाजावर, ता. नगर |
| २१ | अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान<br>शिर्डी ता. राहाता | सदस्य | मा. श्री जयंतराव ससाणे<br>ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर |
| २२ | अध्यक्ष शनि शिंगणापूर ता. नेवासा | सदस्य | मा. श्री. दरंदले |
| २३ | अध्यक्ष, श्री क्षेत्र मढी देवस्थान<br>ता. पाथर्डी | सदस्य | मा. श्री दत्तात्रय नाथा मरकड |
| २४ | अध्यक्ष, श्री क्षेत्र मोहटादेवी ता.<br>पाथर्डी | सदस्य | अध्यक्ष/प्रतिनिधी, श्रीक्षेत्र मोहटा देवी देवस्थान |
| २५ | कुलगुरु कृषि विद्यापिठ<br>राहुरी | सदस्य | मा. डॉ. आर. बी. देशमुख |
| २६ | जिल्हा परिषद अध्यक्ष | सदस्य | मा. ना. सौ. शालिनीताई विखे पाटील<br>मु.पो. लोणी ता. राहाता |
| २७ | जिल्हा परिषद उपाध्यक्ष | सदस्य | मा.श्री. सिताराम देशमुख |
| २८ | महानगरपालिका महापौर | सदस्य | श्री संग्राम जगताप |
| २९ | महानगरपालिका उपमहापौर | सदस्य | श्री नजीर शेख |
| ३० | सर्व नगरपालिका नगराध्यक्ष | सदस्य | सौ. मंदाताई कांबळे<br>नगराध्यक्ष नगरपालिका श्रीरामपूर |
| ३१ | | सदस्य | सौ. अंजली सुधीर तांबे<br>नगराध्यक्ष नगरपालिका संगमनेर |
| ३२ | | सदस्य | सौ. उज्वलाताई जाधव<br>नगराध्यक्ष नगरपालिका कोपरगांव |
| ३३ | | सदस्य | डॉ. सौ. उषाताई तनपुरे<br>नगराध्यक्ष नगरपालिका राहुरी |
| ३४ | | सदस्य | श्री गोरख मुसमाडे<br>नगराध्यक्ष नगरपालिका देवळाली प्रवरा |
| ३५ | | सदस्य | श्री कैलास सदाफळ<br>नगराध्यक्ष नगरपालिका राहाता |
| ३६ | | सदस्य | श्री दिनकर पालवे<br>नगराध्यक्ष नगरपालिका पाथर्डी |
| ३७ | | सदस्य | श्री भागचंद घोडके<br>नगराध्यक्ष नगरपालिका श्रीगोंदा |
| ३८ | | सदस्य | सौ. जयश्री थोरात<br>नगराध्यक्ष नगरपालिका शिर्डी |

| अ.क्र. | सदस्य | पदनाम | मा. सदस्याचे नाव |
|---|---|---|---|
| ३९ | सर्व तालुका पंचायत समिती सभापती | सदस्य | सौ. नलिनी शंकर पाखरे<br>सभापती नगर पंचायत समिती |
| ४० | | सदस्य | श्री अरुण उत्तमराव लांडे पाटील<br>सभापती शेवगांव पंचायत समिती |
| ४१ | | सदस्य | श्री काकासाहेब मुरलीधर शिंदे<br>सभापती पाथर्डी पंचायत समिती |
| ४२ | | सदस्य | सौ प्रिती जाधव<br>सभापती पारनेर पंचायत समिती |
| ४३ | सर्व तालुका पंचायत समिती सभापती | सदस्य | श्री भिमराव निकम<br>सभापती कर्जत पंचायत समिती |
| ४४ | | सदस्य | श्री प्रेमल संजय वराट<br>सभापती जामखेड पंचायत समिती |
| ४५ | | सदस्य | सौ. कासाबाई बाळासाहेब खेतमाळीस<br>सभापती श्रीगोंदा पंचायत समिती |
| ४६ | | सदस्य | श्री. सोनवणे<br>सभापती संगमनेर पंचायत समिती |
| ४७ | | सदस्य | श्री यमाजी सखाराम लहामटे<br>अकोला तालुका |
| ४८ | | सदस्य | सौ. मंदाकिनी अनिल खालकर<br>सभापती कोपरगांव पंचायत समिती |
| ४९ | | सदस्य | सौ. सुनिताताई मिलींद गायकवाड<br>सभापती श्रीरामतपूर पंचायत समिती |
| ५० | | सदस्य | श्री सुभाषराव रामभाउु गाडेकर<br>सभापती राहाता पंचायत समिती |
| ५१ | | सदस्य | श्री भिमराज देवराम हारदे<br>सभापती राहुरी पंचायत समिती |
| ५२ | | सदस्य | श्री नानासाहेब काशिनाथ तुवर<br>सभापती नेवासा पंचायत समिती |
| ५३ | जिल्हयातील सर्व राजकीय पक्ष जिल्हाध्यक्ष | सदस्य | श्री भास्करराव डिक्कर (प्रभारी)( कॉग्रेस ) |
| ५४ | | सदस्य | श्री. घनशाम शेलार (राष्ट्रवादी ) |
| ५५ | | सदस्य | श्री शशिकांत गाडे (शिवसेना ) |
| ५६ | | सदस्य | श्री प्रतापराव ढाकणे (भाजपा) |
| ५७ | | सदस्य | श्री. अशोक गायकवाड (आरपीआय ) |
| ५८ | | सदस्य | श्री. आनंदराव शेळके/ सचिन डफळ (मनसे) |
| ५९ | आर्थिक व वित्तीय सल्लागार | सदस्य | श्री मोहन बरमेचा<br>अध्यक्ष सनदी लेखापाल असोसिएशन |
| ६० | | सदस्य | श्री. पी. एन. देशपांडे<br>सहाय्यक सरव्यवस्थापक बॅक आफ महाराष्ट्र |
| ६१ | व्यवस्थापकीय संचालक एल ॲन्ड टी अहमदनगर | सदस्य | श्री करमरकर |
| ६२ | चेअरमन, व्हीडीओकॉन उद्योगसमुह | सदस्य | श्री राजकुमार धुत<br>श्री विवेक धर्म (सेक्रेटरी) |
| ६३ | मराठा चेंबर ऑफ कॉमर्स | सदस्य | श्री ए. पी. शुक्ला |

| अ.क्र. | सदस्य | पदनाम | मा. सदस्याचे नाव |
|---|---|---|---|
| ६४ | अध्यक्ष अस्मीता इंडस्ट्रीयल असो. | सदस्य | श्री. संतोष बोथरा/ श्री अजित घैसास |
| | **नामनिर्देशित सदस्य सदस्य** | | |
| ६५ | औद्योगिक क्षेत्र | सदस्य | श्री. अनंत देसाई |
| ६६ | शैक्षणिक क्षेत्र | सदस्य | डॉ. शरद कोलते |
| ६७ | व्यावसायिक क्षेत्र | सदस्य | श्री प्रदिपशेट गांधी |
| ६८ | बँकीग क्षेत्र | सदस्य | श्री. सुभाष गुंदेचा |
| ६९ | सामाजिक क्षेत्र | सदस्य | मा. श्री. सुवालाल शिंगवी/ डॉ. गिरीष कुलकर्णी स्नेहालय |
| ७० | | सदस्य | श्री. गफफार शेख |
| ७१ | | सदस्य | श्री. ब्रदर ॲलेक्स (बॉस्को ग्रामविकास केंद्र केडगांव) |
| ७२ | वैद्यकीय क्षेत्र | सदस्य | डॉ. श्री कांडेकर, हृदयरोग तज्ञ्य |
| ७३ | | सदस्य | डॉ. आरोळे, जामखेड |
| ७४ | कला क्षेत्र | सदस्य | श्री प्रमोद कांबळे शिल्पकार |
| ७५ | संस्कृती व कला साहित्य क्षेत्र | सदस्य | श्री. सदाशिव अमरापूरकर |
| ७६ | | सदस्य | श्री डी.एम. कांबळे |
| ७७ | | सदस्य | श्री. जयंत येलुलकर |
| ७८ | क्रिडा क्षेत्र | सदस्य | श्री अशोक पितळे |
| ७९ | हॉटेल्स व्यवसाय क्षेत्र | सदस्य | श्री. तुषार मुथा (हॉटेल संकेत) |
| ८० | टूर ॲन्ड ट्रॅव्हल्स व्यवसाय क्षेत्र | सदस्य | श्री किशोर मरकड |
| ८१ | | सदस्य | श्री अविनाश वैकर |
| ८२ | पत्रकार प्रतिनिधी | सदस्य | श्री. महेंद्र कुलकर्णी |
| ८३ | | सदस्य | श्री. बाळ ज. बोठे |
| ८४ | अध्यक्ष सहकारी बॅक | सदस्य | श्री पांडूरंग अभंग |
| ८५ | अध्यक्ष, अ. नगर मर्चन्टस् बॅक | सदस्य | श्री हस्तीमलजी मुनोत |
| ८६ | अध्यक्ष, अर्बन बॅक | सदस्य | श्री सुवालालजी गुंदेचा |

| अ.क्र. | सदस्य | पदनाम | मा. सदस्याचे नाव |
|---|---|---|---|
| ८७ | सर्व सहकारी साखर कारखाने चेअरमन | सदस्य | चेअरमन, अगस्ती नगर साखर कारखाना ता. अकोले |
| ८८ | | सदस्य | चेअरमन, अशोकनगर साखर कारखाना ता. श्रीरामपूर |
| ८९ | | सदस्य | चेअरमन, श्री ज्ञानेश्वर साखर कारखाना भेंडा ता. नेवासा |
| ९० | | सदस्य | चेअरमन, प्रवरानगर साखर कारखाना ता. राहाता |
| ९१ | | सदस्य | चेअरमन, गणेश नगर साखर कारखाना ता. राहाता |
| ९२ | | सदस्य | चेअरमन, सुमननगर ता. शेवगांव केदारेश्वर साखर कारखाना |
| ९३ | | सदस्य | चेअरमन, कोळपेवाडी ता. कोपरगांव साखर कारखाना |
| ९४ | | सदस्य | चेअरमन, पिंपळगांव पिसा कुकडी साखर कारखाना श्रीगोंदा |
| ९५ | | सदस्य | चेअरमन, शिवाजीनगर राहुरी ,डॉ.बाबासाहेब तनपुरे साखर कारखाना |
| ९६ | | सदस्य | चेअरमन, अमृतनगर संगमनेर साखर कारखाना |
| ९७ | | सदस्य | चेअरमन, सहजानंद कोपरगांव संजिवनी साखर कारखाना |
| ९८ | | सदस्य | चेअरमन, आदिनाथनगर ता.पाथर्डी वृध्देश्वर साखर कारखाना |
| ९९ | | सदस्य | चेअरमन, सोनई ता. नेवासा मुळा साखर कारखाना |
| १०० | | सदस्य | चेअरमन, श्रीगोंदा फॅक्टरी साखर कारखाना |
| १०१ | | सदस्य | चेअरमन, वाळकी ता. नगर साखर कारखाना |
| १०२ | | सदस्य | चेअरमन, देवी भोयरे ता. पारनेर |
| १०३ | | सदस्य | चेअरमन, अंबिका नगर जगदंबा साखर कारखाना ता. कर्जत |
| १०४ | | सदस्य | चेअरमन, साईकृपा देवदैठण ता. श्रीगोंदा साखर कारखाना |
| १०५ | दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर | सदस्य | श्री सदाशिव (अण्णा) पाचपुते |
| १०६ | | सदस्य | श्री रावसाहेब म्हस्के, राहता |
| १०७ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिप | सदस्य | श्री. राजाराम माने |
| १०९ | स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी | समन्वयक | श्री विनायक देशमुख |
| **१०७** | **मा. जिल्हाधिकारी** | **सदस्य सचिव** | **डॉ. पी. अन्बलगन** |

० ० ०

# परिशिष्ट - ब

## जिल्हास्तरावरील विषयवार समित्या आणि त्यांचे समन्वयक

| अ.क्र. | विषय समिती | विषय समिती समन्वयक |
|---|---|---|
| १ | कृषी व संलग्न सेवा क्षेत्र विकास समिती | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी |
| २ | सिंचन क्षेत्र विकास समिती | अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, अहमदनगर. |
| ३ | पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्र विकास समिती | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी |
| ४ | आरोग्य क्षेत्र विकास समिती | जिल्हा शल्य चिकीत्सक |
| ५ | शैक्षणिक क्षेत्र विकास समिती | शिक्षण अधिकारी (प्राथमिक) |
| ६ | जेष्ठ नागरीक समिती | जिल्हा कोषागार अधिकारी |
| ७ | पतपुरवठा योजना विकास समिती | जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था. |
| ८ | दळणवळण विकास समिती | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ |
| ९ | पाणीपुरवठा योजना विकास समिती | अधिक्षक अभियंता (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) |
| १० | औद्योगिक क्षेत्र विकास समिती | महाव्यवस्थापक, जिल्हा ऊद्योग केंद्र |
| ११ | विद्युत विकास समिती | अधिक्षक अभियंता, MSEDCL |
| १२ | नागरी क्षेत्र विकास समिती | सहाय्यक संचालक, नगर रचना |
| १३ | ग्रामीण क्षेत्र विकास समिती | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा |
| १४ | समाजकल्याण समिती | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १५ | महिला व बालकल्याण विकास समिती | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ICDS) |
| १६ | पर्यटन व तिर्थक्षेत्र विकास समिती | जिल्हा नियोजन अधिकारी |
| १७ | कला, संस्कृती व साहित्य क्षेत्र विकास समिती | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) |
| १८ | क्रिडा क्षेत्र विकास समिती | जिल्हा क्रिडा अधिकारी |

० ० ०

# परिशिष्ट - क

## जिल्हास्तरावरील विषयवार समित्या आणि समित्यांचे सदस्य

| अ. क्र. | समितीचे नाव आणि त्यांचेकडील विषय | समितीवरील सदस्य |
|---|---|---|
| १ | **कृषी व संलग्न क्षेत्र विकास समिती**<br>जमिनीचा वापर वाढविणे, पडीत जमिन वापराखाली आणणे, शेतीचे पुरक व्यवसायात वृध्दी करणे, पिक पध्दती सुधारणे, बचत गट, शीतगृहे साखळी स्थापन करणे, अन्नप्रक्रिया युनिट, फुडपार्क, शेती पर्यटन, सिंचनाखालील क्षेत्र वाढवीणे, जलसंधारण विकास कार्यक्रमास गती देणे, शेती उत्पादनात क्षमता वाढविणे, | १. मा. खा. श्री. गोविंदराव आदिक<br>२. मा. श्री. अण्णासाहेब हजारे<br>३. डॉ. आर. बी. देशमुख, कुलगुरु, एमपीकेव्ही<br>४. सर्व साखर कारखान्यांचे चेअरमन<br>५. श्रीमती. पाटील शशिकला सुभाष<br>६. श्री. चेडे वसंत फुलाजी<br>७. श्री. दादा पाटील शेळके<br>८. श्री. भगवानराव नारायणराव पाचपुते, काष्टी<br>९. श्री. देवीप्रसाद अय्यंगार, माध्यम प्रतिनिधी<br>१०. सहसंचालक, साखर, नगर<br>११. जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद<br>**१२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (समन्वयक)** |
| २ | **सिंचन क्षेत्र विकास समिती**<br>जिल्ह्यात सिंचन क्षेत्रात वाढ करणे, सिंचनाच्या सुविधा वाढविणे, लघुपाटबंधारे योजना सर्वेक्षण आणि नविन योजनांची सुचविणे, जलसाक्षरता वाढविणे, पाण्याचा कमीत-कमी वापर करुन सिचन क्षेत्र वढविणे. पाणी योजनांमधील पाण्याची गळती थांबविणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, सांडपाण्याचा पुनर्वापर, पाऊसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त वापर करणे, त्यासाठी पावसाचे पाणी अडवून भुजल पातळी वाढविणे. | १. मा. श्री. बाळासाहेब विखे पाटील<br>२. मा. श्री. शंकरराव कोल्हे<br>३. श्री. घनःशाम शेलार<br>४. श्रीमती. मोटे उषाताई भाऊसाहेब<br>५. श्रीमती. ठोकळ जाईबाई सिताराम<br>६. श्री. दत्तात्रय श्रीराम वारे<br>७. श्री. संबाजीराव गायकवाड<br>८. श्री. सुधीर मेहता, माध्यम प्रतिनिधी<br>९. श्री. शिवाजी शिर्के, माध्यम प्रतिनिधी<br>१०.श्री. राजू शेख, माध्यम प्रतिनिधी<br>११ सर्व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग<br>**१२ अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, (समन्वयक)** |
| ३ | **पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्र विकास समिती**<br>जिल्ह्यातील उपलब्ध असलेले पशुधन, त्यांना आवश्यक असलेल्या पशुवैद्यकीय सुविधा, गावातील शेतक-यांना कमीकमी अंतरावर या सुविधांची निर्मीती करणे. | १. मा. आ.श्री औटी विजयराव भास्करराव<br>२. श्री. सदाशिव (अण्णा) पाचपुते<br>३. श्री. रावसाहेब म्हस्के<br>४. श्री. सोनवणे बाळासाहेब बाजीराव<br>५. श्री. राजेश नामदेव परजणे<br>६. श्री. रावसाहेब नाथाजी म्हस्के, राहता<br>७. श्री. गुलाबराव डेरे, पारनेर<br>८. श्री. वसंतराव सालके, पारनेर (काळकूप)<br>९. पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद<br>**१०. उपआयुक्त जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी(समन्वयक)** |

0 0 0

| | | |
|---|---|---|
| ४ | **आरोग्य क्षेत्र विकास समिती**<br>सर्वांकरीता आरोग्य, जिल्ह्यात आरोग्य सुविधात वाढ करणे, विवाहच्या वेळी मुलीच्या लग्नाचे वय १८ पेक्षा असने काटेकोर अंमलबजावणी करणे, स्त्री-पुरुष यांचे प्रमाण सम प्रमाणात ठेवण्यासाठी जनजागृती करणे, लोकसंख्या नियंत्रण, महिला आणि लहान मुलांचे आरोग्य यासाठी विशेष प्रयत्न करणे. आगामी १० वर्षांकरीता आवश्यक आरोग्य सुविधांचा अभ्यास करणे. | १ मा. आ. डॉ. सुधीर तांबे<br>२ श्री. सिताराम देशमुख, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद<br>३ डॉ. गिरीष कुलकर्णी<br>४ डॉ. श्री कांडेकर, हृदयरोग तज्ञ<br>५ डॉ. आरोळे, जामखेड<br>६ श्रीमती. आंबाडे विजया नानासाहेब<br>७ श्री. भवर केशव छगन<br>८ श्री. बाळासाहेब नामदेव गायकवाड, संगमनेर<br>९. श्री. वाघमारे, माध्यम प्रतिनिधी<br>१०. श्री. अनिल शहा, माध्यम प्रतिनिधी<br>११ जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.<br>**१२ जिल्हा शल्य चिकित्सक (समन्वयक)** |
| ५ | **शैक्षणिक क्षेत्र विकास समिती**<br>प्रत्येक मुलाचे शाळेत नोंदणी झाली पाहिजे, शाळाबाह्य मुलांची संख्या निरंक करणे, गळतीचे प्रमाण टप्प्या-टप्प्याने कमी करणे, जिल्ह्यातील साक्षरता वाढविणे.<br>जिल्ह्यात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे, शैक्षणिक हबची निर्मिती करणे, | १ मा.आ. श्री गडाख शंकरराव यशवंतराव<br>२ डॉ. शरद कोलते<br>३ श्रीमती. घुले मोहिनी प्रविण<br>४ श्रीमती. काकडे हर्षदा विद्याधर<br>५ श्री. वसंतराव कृष्णाजी झावरे पाटील, पारनेर<br>६ श्री. बिपीन शंकरराव कोल्हे, कोपरगांव<br>७ श्री. शिवाजीराव यशवंतराव गर्जे, पाथर्डी<br>८ प्रा. रंगनाथ डागवाले<br>९ श्री. अनिरुध्द देवचाके, माध्यम प्रतिनिधी<br>१०. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी<br>११ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) **(सह समन्वयक)**<br>**१२ शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) (समन्वयक)** |
| ६ | **जेष्ठ नागरीक समिती** | १. मा. आ. डॉ. सुधीर तांबे<br>२. डॉ. गोपाळराव मिरीकर<br>३. श्री. व. ह. दोशी<br>४. श्री. रामराव चव्हाण<br>५. प्रा. खोसेराव शितोळे<br>६. श्री. रामनाथ वाघ<br>७. श्री. कोतकर सर, अकोले.<br>८. श्री. अनंत देशपांडे, अकोले.<br>९. जिल्हा शल्य चिकित्सक<br>१०. विभाग नियंत्रक, एस. टी. महामंडळ<br>**११. जिल्हा कोषागार अधिकारी (समन्वयक)** |

0 0 0

| | | |
|---|---|---|
| ७ | **पतपुरवठा योजना विकास समिती**<br>जिल्ह्यातील पतपुरवठा आराखड्यात आवश्यक त्या सुधारणाकरुन पतपुरवठा आराखड्यात वाढ करणे, त्यांची काटेकोर अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना तयार करणे, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, कृषी पत आराखड्यात वाढ करुन पिक पध्दतीत सुधारणा करणे, उत्पाद्न वाढविणे पिक कर्ज उपलब्ध करुन देणे, इत्यादी | १ मा.आ.श्री.चंद्रशेखर मारुतराव घुले<br>२ श्री. मोहन ब्रम्हेचा<br>३ श्री. पी. एन. देशपांडे<br>४ श्री. पांडूरंग अभंग<br>५ श्री. हस्तीमलजी मुनोत<br>६ श्री. सुवालालजी गुंदेचा<br>७ श्री. लंघे विठ्ठलराव वकीलराव<br>८ श्री. नाईक बाळासाहेब विठ्ठलराव<br>९ श्री. बाबासाहेब भोस<br>१० श्री. रामदास ढमाले, माध्यम प्रतिनिधी<br>११. श्री. विजय दुधभाते, माध्यम प्रतिनिधी<br>१२ श्री. भानुदास काशिनाथ मुरकुटे, श्रीरामपूर<br>१३ नाबार्ड आणि लिड बॅंक प्रतिनिधी<br>**१४ जिल्हा उपनिबंधक सह.संस्था (समन्वयक)** |
| ८ | **दळणवळण विकास समिती**<br>जिल्ह्यात उत्कृष्ट दळवळणाच्या सुविधा निर्माण करणे. | १ मा.आ.श्री पिचड मधुकर काशिनाथ<br>२ श्री प्रतापराव ढाकणे<br>३ श्री. हराळ बाळासाहेब रघुनाथ<br>४ श्री. शेलार अण्णासाहेब सिताराम<br>५ श्री. सिदार्थ मुरकुटे<br>६ ॲड. वसंतराव मनकर<br>७ ॲड. आझाद ठुबे<br>८ श्री. नरहर कोरडे, माध्यम प्रतिनिधी<br>९ बांधकाम विभागातील सर्व कार्यकारी अभियंता<br>१० जिल्हा पोलिस अधिक्षक<br>११. जिल्हा परिवहन अधिकारी,<br>**१२ अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर (समन्वयक)** |
| ९ | **पाणीपुरवठा विकास समिती** | १. मा. आ. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील<br>२. मा. आ. श्री. राम शंकर शिंदे<br>३. श्री. नंदकुमार झावरे<br>४. श्री. बिपीन कोल्हे<br>५. श्री. सिताराम गायकर<br>६. प्रा. शशिकांत गाडे<br>७. श्रीमती. काकडे हर्षदा विद्याधर<br>८. शहर अभियंता, मनपा, पाणीपुरवठा विभाग<br>९. कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. जिल्हा परिषद<br>**१०. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर. (समन्वयक)** |

0 0 0

| | | |
|---|---|---|
| १० | **औद्योगीक क्षेत्र विकास समिती**<br>जिल्ह्यातील औद्योगीक क्षेत्रात लक्षणीय वाढ होणेबाबत प्रयत्न करणे. औद्योगीक विकासकरीता आवश्यक पायाभुत सुविधा निर्माण करणे, उद्योगास अनुकुल वातवरण निर्माण करणे. उद्योजक आणि कामगार यांच्यात सुसंवाद निर्माण करणे. | १ मा.आ.श्री अनिलभैय्या रामकिसन राठोड<br>२ मा.श्री. दादाभाऊ दशरथराव कळमकर<br>३ श्रीमती. जायभाय चंद्रकला सुभाष<br>४ श्री. करमरकर<br>५ श्री. राजकुमार धुत<br>६ श्री. ए. पी. शुक्ला<br>७ श्री. संतोष बोथरा<br>८ श्री. अजित घैसास<br>९ श्री. अनंत देसाई<br>१०. श्री. प्रकाश सिमरतमल गांधी<br>११. श्री. मुकुंद घैसास<br>१२. श्री. प्रदिपशेट गांधी<br>१३. श्री. बाळ ज. बोठे, माध्यम प्रतिनिधी<br>१४. श्री. नंदकुमार पाटील, माध्यम प्रतिनिधी<br>१५. श्री. जितेंद्र आगरवाल, माध्यम प्रतिनिधी<br>**१६. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र (समन्वयक)** |
| ११ | **विद्युत विकास समिती**<br>जिल्ह्यात पवनचक्की, सौरउर्जेचा वापर वाढविणे, उपलब्ध वीज त्याचा योग्य वापर आणि गळतीचे प्रमाण कमी करणे | १ मा.आ.श्री अशोकराव शंकरराव काळे<br>२. श्री आण्णासाहेब म्हस्के<br>३ श्री. सचिन डफळ<br>४ श्री. परजणे राजेश नामदेवराव<br>५ श्री. पिसाळ अंबादास शंकरराव<br>६ श्री. तानाजीराव धसाळ, राहूरी<br>७ श्री. राजेंद्र आनंदराव फाळके, कर्जत<br>८ श्री. सविन गुजर<br>९ श्री. डेरेकर, माध्यम प्रतिनिधी<br>१० या विभागील सर्व कार्यकारी अभियंता<br>**११ अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत विकास कंपनी (समन्वयक)** |
| १२ | **नागरी क्षेत्र विकास समिती**<br>जिल्ह्यातील शहराची आगामी १० वर्षातील वाढ विचारात घेऊन या क्षेत्रात पायाभुत सुविधाचा सर्वंकष विकास आराखडा तयार करणे. प्रत्येक शहरात वृध्द आणि मुलांकरीता उद्यानांची निर्मीती करणे, जलतरण तलाव, नाट्यगृह, चित्रपट गृह, बहुउद्देशीय सभागृह, जॉगींग पार्क इत्यादी सुविधा निर्माण करणे,<br>पिण्याचे पाणी, भुयारी गटार, सार्वजनिक स्वच्छता, सांडपाण्याचा निचरा आणि पुनर्वापर, अंतर्गत रस्ते, शहरांतर्गत प्रवासाची सार्वजनिक सुविधा, गृहनिर्माण (झोपडपट्टी निवारण), ईत्यादी | १. मा.खा.श्री. गांधी दिलीपकुमार मनसुखलाल<br>२. श्री. संग्राम जगताप, महापौर<br>३. श्री. नजीर शेख, उपमहापौर<br>४. सर्व नगरपालिका/नगर पंचायत यांचे नगराध्यक्ष<br>५. श्री. होळकर अरुण सिताराम<br>६. श्री. जाधव भारत किसन<br>७. श्रीमती. सुमित्रा कोते, नपा शिर्डी<br>८. श्री. नंदकुमार सोनार, माध्यम प्रतिनिधी<br>९. श्री. पराग चौकार, माध्यम प्रतिनिधी<br>१०. सर्व नगरपालिका मुख्याधिकारी<br>११. जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर पालिका शाखा<br>१२. आयुक्त मनपा, अहमदनगर (सह समन्वयक)<br>**१३.सहाय्यक संचालक, नगर रचना (समन्वयक)** |

0 0 0

| | | |
|---|---|---|
| १३ | **ग्रामीण क्षेत्र विकास समिती**<br>पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता, सांडपाण्याचा निचरा आणि पुनर्वापर, अंतर्गत रस्ते, बहुउद्देशीय सभागृह, आरोग्य सुविधा, बचत गटांना प्रोत्साहन, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, कृषी उत्पादनासोबत इतर पुरक व्यवसायात वाढ करणे, दरडोई उत्पन्नात वाढ करुन दारिद्र्य निर्मुलन करणे. | १ मा.आ. श्री. कर्डीले शिवाजी भानुदास<br>२ श्री पोपटराव पवार<br>३ सर्व पंचायत समिती सभापती<br>४ श्री. ब्रदर ॲलेक्स(बॉस्को ग्रामविकास केंद्र केडगांव)<br>५ श्री. गडाख सुनिल विश्वासराव<br>६ श्री. कदम रतन देवजी<br>७. श्री. आण्णासाहेब पा. पाटील, श्रीगोंदा<br>८. प्रा. बी. एन शिंदे, हवामान शास्त्र तज्ञ<br>९. श्री. निमसे, माध्यम प्रतिनिधी<br>१०. श्री. सचिन अग्रवाल, माध्यम प्रतिनिधी<br>११. जिल्हा पुरवठा अधिकारी<br>१२ उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)<br>**१३ प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (समन्वयक)** |
| १४ | **समाज कल्याण समिती**<br>अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांचे कल्यानकारी योजना, पारधी आणि उन्नती प्रकल्पाची अंमलबजावणी, | १. मा. खा. श्री वाकचौरे भाऊसाहेब राजाराम,<br>२. मा. आ. श्री. कांबळे भाऊसाहेब मल्हारी<br>३. श्री. शिरसाठ अर्जुन भगवानराव<br>४. श्री. अनिल ठवाळ<br>५. श्री. प्रकाश त्रिंबक भोसले, शेवगाव<br>६. श्री. अशोक गायकवाड<br>७. श्रीमती. सुनिता गायकवाड, पं.स.सभापती,श्रीरामपुर<br>८. श्री. वैभव पिचड<br>९. प्रकल्प संचालक, आदिवासी विभाग, राजूर<br>१०. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद<br>११. व्यवस्थापक, मागासवर्गीयांचे विकास महामंडळे<br>**१० विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (समन्वयक)** |
| १५ | **महिला व बालकल्याण विकास समिती**<br>महिला सबलिकरण, सुरक्षा, बालकांचे आरोग्य, १००० पुरुषांमागे कमी होत असलेले स्त्रीयांचे प्रमाण, स्त्रीयांचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण, महिलांचे रोजगाराचे प्रश्न, बालमजुर, इत्यादी | १ मा. ना. सौ. शालिनीताई विखे पाटील<br>२ मा. आ.श्री. कांबळे भाऊसाहेब मल्हारी<br>३ मा. श्री. सुवालाल शिंगवी<br>४ श्रीमती. लांडगे महानंदा अनिल<br>५ श्रीमती. दिघे आशाताई बाबासाहेब<br>६. श्री. उचाळे मधुकर म्हातारबा<br>७. सौ. सावित्राताई शरद जाधव, निंभारी, ता. नेवासा<br>८. श्रीमती. रईसा शेख,<br>९ ॲड. शारदाताई लगड<br>१०. श्रीमती शिल्पा रसाळ, माध्यम प्रतिनिधी<br>११ बाल विकास प्रकल्प अधिकारी, शहरी भाग<br>**१२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (आय.सी.डी.एस.) (समन्वयक)** |

0 0 0

| | | |
|---|---|---|
| १६ | **पर्यटन व तिर्थक्षेत्र विकास समिती**<br>जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळे जागतीक नकाशावर आणण्यासाठी प्रयत्न करणे, पर्यटन स्थळांवर पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सोई-सुविधा निर्माण करणे, पर्यटन स्थळावर जाण्यासाठी दळवळणाच्या सुविधा निर्माण करणे, या स्थळांचा प्रचार व प्रसार करणे. माहिती पुस्तिका तयार करणे, शिर्डी येथे येणा-या भाविकांना जिल्ह्यातील इतर पर्यटन स्थळांवर आकर्षित करण्याकरीता जाणीवपुर्वक प्रयत्न करणे. | १. मा.खा. श्री वाकचौरे भाऊसाहेब राजाराम,<br>२. मा. श्री जयंतराव ससाणे, श्री साईबाबा संस्थान<br>३. श्री. आहेर जनार्दन म्हातारबा<br>४. श्री. दरंदले, अध्यक्ष, श्रीक्षेत्र शनिशिंगणापुर<br>५. श्री. दत्तात्रय नाथा मरकड, श्रीक्षेत्र मढी देवस्थान<br>६. अध्यक्ष/प्रतिनिधी, श्रीक्षेत्र मोहटा देवी देवस्थान<br>७. श्री. सुभाष गुंदेचा<br>८. श्री. तुषार मुथा (हॉटेल संकेत)<br>९. श्री. किशोर मरकड<br>१०. श्री. अविनाश वैकर<br>११. श्री. महेंद्र कुलकर्णी, माध्यम प्रतिनिधी<br>१२. श्री. दत्ता इंगळे, माध्यम प्रतिनिधी<br>**१३. जिल्हा नियोजन अधिकारी (समन्वयक)** |
| १७ | **कला, संस्कृती आणि साहित्य क्षेत्र विकास समिती**<br>जिल्ह्यातील गुणी कलाकारांना त्यांच्या कला वाढीच्या संधी निर्माण करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, प्रत्येक शहरात नाट्यगृहाची निर्मीती करुन स्थानिक कलाकारांना जास्तीजास्त वाव देणे. | १ मा.आ.श्री.प्रा.राम शंकर शिंदे<br>२ श्री. अशोक गायकवाड<br>३ श्री. प्रमोद कांबळे<br>४ श्री. सदाशिव अमरापूरकर<br>५ श्री. डी.एम. कांबळे<br>६ श्री. जयंत येलुलकर<br>७ श्रीमती. गोरखे लताबाई अशोक<br>८ डॉ. अनिल सहस्त्रबुद्दे<br>९. श्री. भुषण देशमुख, माध्यम प्रतिनिधी<br>१० श्री. श्रीराम जोशी, माध्यम प्रतिनिधी<br>११. श्री. राजेंद्र त्रिमुखे, माध्यम प्रतिनिधी<br>**१२ उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) (समन्वयक)** |
| १८ | **क्रिडा क्षेत्र विकास समिती**<br>राष्ट्रीय खेळाडू निर्माण करणे, प्रत्येक गावात आरोग्याच्या दृष्टीने खेळाचे महत्व वाढविणे. आवश्यक त्या सुविधा निर्माण करणे. | १. मा.आ श्री अरुणकाका जगताप<br>२. श्री शशिकांत गाडे<br>३. श्री. गफफार शेख<br>४. श्री. अशोक पितळे<br>५. श्री. राजळे शिवशंकर अर्जुनराव<br>६. श्री. सांगळे गणपत पुंजाजी<br>७. श्री. प्रसादराव बाबुराव तनपुरे, राहूरी<br>८. श्री. उबेद शेख<br>९. श्री. अशोकराव संभाजीराव बाबर<br>१०. श्री. संदिप गोरक्षनाथ वर्पे<br>११. डॉ रविंद्र कवडे<br>१२ श्री. पंकज नवनाथ शिरसाठ<br>१३. श्री. ललित गुंदेचा, माध्यम प्रतिनिधी<br>**१४. जिल्हा क्रिडा अधिकारी (समन्वयक)** |

0 0 0